## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

माहितीचा अधिकार

---

तक्रार क्रमांक- १०८८/ २०२३/ पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलिय अधिकारी तथा |
| गणेश निवृत्ती गडगे | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वडगाव आनंद, ता. जुन्नर, जि. पुणे | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती जुन्नर जि. पुणे |

(निर्णय दिनांक- ०६.०६.२०२५)

तक्रारदार यांचा कलम-१८ अंतर्गत तक्रार अर्ज दिनांक ३०.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झाला आहे. तक्रारदार यांनी आयोगाचा आदेश पारित होऊन जन माहिती अधिकारी यांनी अद्याप माहिती उपलब्ध करून दिली नाही अशा आशयाची तक्रार केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे आणि त्यानुसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणानी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(९) नुसार राज्य माहिती आयोग, तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

सदर तक्रार अर्जाशी संबंधित व्दितीय अपील क्रमांक ८०७-२०१९-पुणे यामध्ये आयोगाने दिनांक ०२.०१.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला आहे.

प्रस्तुत प्रकरणी उपलब्ध असलेल्या अभिलेखावरून आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदर प्रकरणात विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वडगाव आनंद, ता. जुन्नर, जि. पुणे यांना सूचीत करण्यात येते की त्यांनी वर नमूद द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार सदरचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात कार्यवाही करावी व तसे तक्रारदार यांना कळवावे.

आदेश

वरील निर्देशासह तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक - १०८८ /२०२३ / पुणे 8436/2025

दिनांक- 16/6/2025